राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र.CIC/अ.क्र.६६५०/२०२६

श्री. नौशेरवान बलोच
21/ए, दौलत हाऊस, गावदेवी मंदिरा जवळ
व्ही.पी.रोड, अंधेरी [प.] मुंबई-४०००५८.

विरुद्ध

जनमाहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, वर्सोवा शाखा,
अंधेरी (सा.बां.) उपविभाग, प्रशासकीय इमारत,
दुसरा मजला, भवन्स महाविद्यालयाजवळ, अंधेरी (प), मुंबई-58.

प्रथम अपिलीय अधिकारी
उप विभागीय अभियंता यांचे कार्यालय, अंधेरी (सा.बां.) उपविभाग,
प्रशासकीय इमारत, दुसरा मजला,
भवन्स महाविद्यालयाजवळ, अंधेरी (प), मुंबई-58.

द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १०.०८.२०२६

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

मूळ अर्जाचा दिनांक	जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक	प्रथम अपीलाचा दिनांक	प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक
०२.०३.२०२२	--	२५.०४.२०२२	१२.०८.२०२२

अपिलार्थीनी दाखल केलेल्या दिनांक ०२.०३.२०२२ रोजीच्या **जोडपत्र अ** नुसार गिल्बर्ट हिल हेरिटेज ग्रेड-२ ए, गावदेवी मंदिर, अंधेरी (पश्चिम) येथे बांधण्यात आलेल्या संरक्षक भिंत व इतर बांधकामाविषयी अपिलार्थीनी माहिती मागितली असता तत्कालीन अपिलीय अधिकाऱ्यांच्या दिनांक १२.०८.२०२२ रोजी च्या आदेशान्वये उपरोक्त माहिती अपिलार्थींना प्रदान करण्याचे निर्देश देण्यात आले होते. तथापि, त्याचे अनुपालन झाले नसल्याचा आक्षेप नोंदवीत प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज दाखल करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकाऱ्यांनी संबंधित माहिती ही अपिलार्थींना अपिलीय अधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार तात्काळ उपलब्ध करून देण्यात येईल असे सूचित केले आहे. तसेच अपिलार्थीनी याच विषयाशी संदर्भित अधिक माहिती अधिकार अर्ज टाकले असून कायदेशीर नोटीस देखील बजावलेली असून

त्यांना विभागाच्या वतीने या आधीच उत्तर देण्यात आलेले आहे असे नमूद केलेले आहे. ही बाब लक्षात घेता विद्यमान जन माहिती अधिकाऱ्यांनी अपिलीय अधिकाऱ्यांच्या दिनांक १२.०८.२०२२ रोजीच्या आदेशाचे तात्काळ अनुपालन करण्याचे निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

आदेश

१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

२. अपिल क्र.६६५०/२०२६ निकाली काढण्यात येत आहे.

स्वाक्षरीत/-

मुंबई **(राहुल भा.पांडे)**

दिनांक : १०.०८.२०२६ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**